ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# बुलढाणा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ

**प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे**
**कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव , ता. कारंजा जि. वाशीम.**



*प्रस्तावना :*

महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीत सत्यशोधक समाज चळवळीची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. समाजात समता निर्माण करण्यात व सामाजीक परिवर्तनामध्ये सत्यशोधक समाजाचे योगदान फार मोठे आहे. सत्यशोधक समाजाने आपले सामाजिक तत्वज्ञान क्रियाशिलता यांच्या जोरावर महाराष्ट्राच्या समाज सुधारणा इतिहासात फार मोठी क्रांती घडवून आणली. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रात समाजव्यवस्थित आमूलाग्र परिवर्तन घडून आल्याच्या उद्देशाने महात्मा फुल्यांनी ही चळवळ सुरू केलेली होती. म. फुल्यांच्या मते येथील समाज व्यवस्थेत ब्राम्हण व वरिष्ठ जातीचे वर्चस्व निर्माण झाले होते. ब्राम्हणांनी धूर्तपणे व लबाडीने धर्मशास्त्रे निर्माण करून त्यात अनेक खोट्यानाट्या कथा घुसडल्या आणि शुद्राअतिशुद्रास गुलामगिरीच्या खाईत लोटले. समाजात विषमता निर्माण झाली. जातीभेदात वाढ झाली उचनिचता निर्माण झाली हि नष्ट करण्यासाठी म. फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना 24 सप्टेबर 1873 साली केली. संस्थापक सभासदामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील लक्ष्मणराव हरी शिंदे हे सुध्दा होते. म्हणून या चळवळीचा बुलढाण्यात कसा विकास झाला त्यासाठी कोणी कार्य केले ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

## 1) सत्यशोधक समाजाची प्रतिज्ञा :-

सत्यशोधक समाजामध्ये एकोपा निर्माण व्हावा आणि सर्व सभासदानी सत्यशोधक समाजाचे तत्व सिध्दांत नियम अटी याचे पालन करावे या साठी या समाजाचे सभासदत्व घेण्याअगोदर होणाऱ्या सभासदास प्रतिज्ञा घ्यावी लागे ती म्हणजे सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत. सबब ती माझी भावंडे आहेत. अशा बुध्दीने मी त्यांच्याशी वागेन परमेश्वराची भक्त पुजा अगर ध्यानधारणा करते वेळी अगर धार्मीक विधीचे वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. मी नेहमी राजनिष्ठेने वागेन परमेश्वराची व सत्यस्वरूपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल अशा प्रकारे आयुष्यक्रम योग्य प्रकारे गुदरण्यास तो मला मदत करो[1]. अशा प्रकारची प्रतिज्ञा घ्यावी लागत होती. या चळवळीत सर्वच समाजाचे कार्यकर्ते होते त्यामध्ये सुरूवातीपासून बुलढाणा जिल्ह्या त्यातील काही कार्यकर्ते पुढील प्रमाणे.

## 2) बापूजी हरि शिंदे कडून रामचंद्राने प्रेरणा घेतली.

बुलढाणा विभाग हा सत्यशोधक समाज स्थापनेपासूनच या चळवळीशी निगडीत राहीला. रा. रा. बापूजी हरी शिंदे व रा. रा. रामचंद्रराव हरि शिंदे हे दोन्ही भाऊ सुरवातीपासुन या चळवळीशी जुळले होते. त्यांनी अनेक युवक तयार केले. व सत्यशोधक समाजाच्या वार्षीक समारंभात ते सहभाग घेत तिसऱ्या परिषदेमध्ये एक ठराव असा ठरला. अहमदाबाद या ठिकाणी जलप्रलय झालेला आहे. त्यासाठी सत्यशोधक समाजा तर्फे पिडीतांना मदत देण्याचे ठरले व या ठरावास श्री रामचंद्रराव हरि शिंदे यांनी अनुमोदन दिले होते. त्यांनी सत्याशोधक समाजातील सदस्यांची मोठया प्रमाणात वाढ केली. रामचंद्रराव हरी शिंदे यांनी आपल्या भावापासून प्रेरणा घेऊन इ. स. 1876 ला या समाजाचे सदस्यत्व घेतले. शिवाय ते ज्योतीबा फुलेचे सामाजिक, आर्थिक, क्षेत्रातही सहकारी होते.[2] सुरवातीला या समाजात काम करणाऱ्यावर बहीष्कार टाकल्या जात होता तरी त्यांनी कोणताही विचार केला नाही उलट सत्यशोधक समाजाच्या विकासासाठी जी वर्गणी केली त्यात 15 रूपये रा. रा. रामचंद्र हरी शिंदे यांनी देवून आपले योगदान स्पष्ट केले.

## 3) सत्यशोधक समाजाची वऱ्हाडात स्थापना

वऱ्हाडात स्वत: ज्योतीबा येऊन तेथे आपल्या समाजाची स्थापना करणार होते पण त्याची प्रकृती ठिक नसल्यामुळे नारायणराव लोखंडे यांनी या प्रातांत सत्यशोधक समाज स्थापनेसाठी प्रयत्न केले. मलकापूर येथे त्यांनी 6 महिने राहून हे कार्य केले ते म्हणत. ग्रामसुधारणा करा, भटभडजीचे कर्मकांड सोडा. सत्यशोधक विचारसरणीचा अवलंब करा असा असा आदेश त्यानी आपल्या सहकाऱ्यांना दिला. म्हणून सर्व समाजाचे लोक जागृत झाले. या संदर्भात पंढरीनाथ पाटील म्हणतात. “अशा प्रकारे समाज स्थापन झाल्यापासून अवघ्या दोन तीन वर्षात त्याचा कल्पनेबाहेर प्रसार झाला. कारण सुरूवातीला ते एकटेच होते मात्र आता 300 ते 400 लोकांनी ज्योतीरावाचे कार्य होती घेतले होते.”[3] बुलढाणा जिल्ह्यात बापूजी हरी शिंदे व रा. रामचंद्रराव हरी शिंदे दोघे मोठ्या प्रमाणात कार्य करीत होते. वऱ्हाडात

शेतकऱ्याची स्थिती चांगली असल्यामुळे ते सदैव कर्मकांडात राहात असे अशा परिस्थितीत जिगाव ता. मलकापुर जि. बुलढाणा येथे इ. स. 1886 मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व ही चळवळ बुलडाणा जिल्ह्यात व्यापक झाली.

### 4) पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील याचे कार्य :-

बुलढाण्याचे बापूजी हरी शिंदे व रामचंद्रराव हरी शिंदे या दोन भावाच्या प्रेरणेतून पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी पंढरीनाथ पाटील यांनी सत्यशोधक चळवळ मोठ्या प्रमाणात बुलढाणा जिल्ह्यात विकसीत केली. अस्पृश्य उदारासाठी कार्य त्यांनी श्रावण भटकर यांच्या चिखली येथे भेट झाल्या पासून सुरू केले. भारतीय बहिष्कृत परिषदेची सभा नागपूर ला झाली तेथे शाहुमहाराज अध्यक्ष होते. त्याच्या भाषणाने ते प्रेरीत झाले. पंढरीनाथ पाटलानी अस्पृश्यांच्या परिषदा आयोजीत केल्या त्यामध्ये खामगाव जि बुलढाणा, हिंगणे कारेगाव येथे 17 व 18 नोव्हेंबर 1924, चांभार व महार परिषद आयोजीत केली[4]. या परिषदेत महत्वाचे ठराव पास केले. दि. 21 व 22 मे 1926 रोजी आनंदस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली चांभार परिषद भरविली गेली. शिक्षणाचा विचार अस्पृश्यांमये रूजवण्याचा पंढरीनाथ पाटलाणी विचार मांडला. 20 जुलै1927 मध्ये पुणे येथे डॉ. आंबेडकराच्या प्रमुख उपस्थिती मातंग परिषदेत पंढरीनाथ पाटलाना मातंगाना चेतना व स्फुर्ती देणारे भाषण केले. सन 1927 ला सातगाव भूसारी जि. बुलढाण येथे आयोजीत 'वऱ्हाड प्रांतीय अस्पृश्य महार परिषद' फार महत्वाची होती. सातगाव भुसारी येथील अस्पृश्य समाजाचे श्री एम. के. जाधव यांनी जिल्ह्यात प्रथमच आय एस ची परीक्षा पास केल्याबद्दल त्यांचा सत्कार होता कारण ते भारतातील आय. एस. ची परीक्षा पास होणारे पहिलं अस्पृश्य होते. त्यानंतर 4 व 5 जून 1932 ला उद्री ता. जि. बुलढाणा येथे जिल्हा ब्राम्हणेत्तर परिषदेचे आयोजन केले. या परिषदेमध्ये उंद्री गावातील सर्व विहीरी व मंदीरे अस्पृश्यासाठी खुले करण्याचा महत्वपुर्ण ठराव येथे पास करण्यात आला. या परिषदेचे अध्यक्ष रामराव दरबाजी यानी गावातील आठवडी बाजारातील विहीरी तथा मंदीर अस्पृश्यांसाठी स्वतः खुंले केल्या. बुलढाण जिल्हा शिवाय इतर ही ठिकाणी बुलढाणा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते जात असत व जागृती करीत. सत्यशोधक कार्यकर्ते पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी जिल्ह्याबाहेर आनंद स्वामी सामाजिक व राजकीय जागृती करीत असत.

### 5) बुलढाणा जिल्ह्यातील सत्यशोधकी जलसे :-

सत्यशोधक चळवळ सभा आणी चळवळीपुरतीच मर्यादित नव्हती. वृत्तपत्रे, पत्रके. गावोगावी सभा या पेक्षाही लोकांपर्यंत सत्यशोधक विचार पोहचण्याचे प्रभावी साधन म्हणजे जलसे यानी केले. 'जलसा हा शब्द जल्लोश, जुलुस यात्रोउत्सव मनोरंजनासाठी काही उत्स्फुर्त कृती या आशयातुन रूढ झाला असावा. थोडक्यात जलसा अथवा तमाशा हे शब्द आणि त्यांच्याउत्पत्ती संदर्भातून आनंद देणाऱ्या उत्स्फुर्त कला एवढा सांगता येईल.' जलसा याचा अर्थ असा सुध्दा सांगता येतो सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी बहुजनातील प्राकृतिक तत्वांनी भरलेल्या कलावंतांनी समाज प्रबोधनाचे मूल्य रूजविण्यासाठी सादर केलेली कल्पक प्रहसनवजा कलाकृती म्हणजे सत्यशोधक जलसा.[6] जलश्यातून ब्राम्हणावर प्रथमकोरडे ओढण्यास सुरूवात केली. विधवा विवाह केशवपण, जातीभेद, ब्राम्हणांचे कसब, हे विषय प्रामुख्याने घेतले जात. सत्यशोधक जलसे हे सत्य बाहेर आणण्याचे कार्य करतात पण तसे प्रस्थापीतांना नको होते त्यामुळेच सत्यशोधक जलसे हे रूढीवाद्यांना व विरोधकांना अश्लिल वाटतात.[7] मात्र याच जलश्यांनी सामाजिक विकृतीला चव्हाटयावर आणण्याचे कार्य केल्याचे स्पष्ट होते. इ. स. 1853 झाली महात्मा फुलेंनी 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहीले. या नाटकातील आशय व शैली यावरून तृतीयरत्नापासून सत्यशोधक जलश्याची सुरूवात झाली होती. भिमराव महामूनी हे पहिले सत्यशोधक जलश्याचे शाहीर ठरतात. डूकरे पाटील याच्यासोबत 1906 मध्ये विदर्भात पहिल्यांदा जलश्याचे प्रयोग सादर करण्यात आले. सुरूवातीच्या काळात पश्चिम महाराष्ट्रातील जलसे बुलढाणा जिल्ह्यात येऊन जलसे करत असत. विश्राम बुवा उर्फ विश्रामरावजी पाटील, वाळद जि. जळगाव हे विदर्भात सत्यशोधक जलशाचा प्रचार करत तेव्हा पंढरीनाथ पाटील व आनंदी स्वामी त्यांना सहकार्य करीत असत. हरीचा जलसा हा विदर्भातील महत्वपुर्ण पहिला जलसा होता. बुलढाणा जिल्ह्यात गुलाबराव शिसोदे यांनी अनेक जसले सादर केले होते. या जलश्या नायगांवचा जलसा म्हणत असत. बुलढाणा जिल्ह्यातील सत्यशोधकी विचारांनी भारलेल्या कार्यकर्त्यांनी जलश्याची निर्मीती केली. पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी यांचा जलसा व किर्तन प्रसिध्द होते. यामध्ये आनंदस्वामी यांनी सत्यशोधक जलसे संघटीत करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पुढाकार घेतला.[8] त्याचप्रमाणे केळवदच्या नारायण पाटील यांचा जलसा, होता त्याचप्रमाणे, बुलढाण्यातील बाजीराव शिंगणे हे बुलढाण्यातील प्रमुख सत्यशोधकी कार्यकर्ते होते. ते जलशात गाणी म्हणणाऱ्यांना ते साथ देत असत. देऊळगाव राजा येथील भागुजी दत्तोवाल सत्यशोधक जलशामध्ये तुणतुणे वाजवीत असे. नारायण पाटील यांनी आपल्या सत्यशोधकी जलशातून बुलढाणा, मेहकर, चिखली ह्या भागात मोठ्या प्रमाणात पेरून शेतकऱ्यांच्या व्यथा, दशा, त्याच्यासमोर मांडल्याने बुलढाणा जिल्ह्यात या जलशामूळे कृषी चळवळ उभी राहू शकली.

### 6) बुलढाणा चिल्ह्यात सत्यशोधक विधी व विवाह :-

सत्यशोधक विवाह व विधी हे सत्यशोधक चळवळीचे महत्वपुर्ण होते. त्यात घरभरणी वास्तुशांती सत्यनारायण इ. पुजापध्दतीचा समावेश होता. सत्यशोधक चळवळीमध्ये हळूहळू स्वतःचे विधी स्वतः करण्याची परंपरा सुरू झाली. जेणे करून मध्यस्थ वर्गाला धार्मीक कार्यातुन जाणारा पैसा वाचवता येईल. हा उद्देश होता. त्यामध्ये स्वतः महात्मा जोतीबा फुलेनी 'विवाह' हे सत्यशोधक पध्दतीने लावण्यास सुरूवात केली होती. त्यासाठी त्यांनी पाच मंगलाष्टकांची निर्मीती केली होती. शिवाय अतिशय साध्या पध्दतीने लग्न लावून वधू-वराला एक शपत घ्यावी लागे व त्यानंतर विवाह संपन्न होई. सत्यशोधक चळवळ बुलढाणामध्ये प्रभावीपणे राबवली त्यात विवाह संमारंभ सुद्धा मागे नव्हता. त्यामध्ये प्रमुख कार्यकर्ते म्हणजे रामराव शिंगणे, खंडेराव जाधव, रा. राजाराम गायकवाड बळवंता हटकर, मेसर्स भोसले, मिरमे, चुंभळकर, मेहेत्रे बोरावळे, गंगाराम मास्तर इत्यादी सत्यशोधक मध्दतीने विवाह बुलढाणा जिल्ह्यात देऊळगाव मही येथे 50 विवाह लावले. अडगांवराजा व चौथा, देऊघाट पाडळी, जळगाव जामोद, पळसखेड, दत्तपूर इ. ठिकाणी सत्यशोधक पध्दतीने विवाह विविध विधी संपन्न झाल्यामुळे सत्यशोधक चळवळ मोठ्या प्रमाणात बुलढाणा जिल्हात वाढ झाली.

महात्मा जोतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची पुणे येथे स्थापना जरी केली असली तरी या चळवळीचा बुलढाणा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात ती विकसीत झाली लोकांनी आपल्या घरावर तुळशी पत्र ठेवून स्वतःला वाहुन घेऊन संपुर्ण आयुष्य या सेवेत घालवले. अनेक गावामध्ये सत्यशोधकी परिषदेचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात लोक त्या परीषदेला हजर राहत. अस्पृश्यांच्या उध्दारासाठी परिषदेचे आयोजनच केले नाही तर उद्री सारख्या ठिकाणी विहिरीचे पाणी खुले केले जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी सामाजिक विरोधाला जुमानले नाही. धार्मीक विधी करण्याची सामान्य माणसाला ताकद व सर्व सामान्यांना सोबत घेऊन कार्य करण्याची पध्दती यामुळेच पुढील सामाजिक सुधारणेची पार्श्वभुमी तयार करण्यामध्ये सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे हातभार लागला. सत्यशोधक चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ होऊ शकली. सामाजिक रूढी पंरपरेला चिटकुन असणारा समाज पुरोहिताच्या मदतीशिाय धार्मीक विधी करायला लागला ही बाब सामाजिक परिवर्तनाचे मोठे निदर्शक होती. सत्यशोधक समाजामुळेच हे सर्व शक्य होऊ शकले व सामाजिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवल्या गेली.

**संदर्भ ग्रंथ सुची**


1) बागल माधव खंडेराव (संपा) सत्यशोधक हिरक महोत्सव ग्रंथ 1933, प्रदिप गायकवाड नागपूर, पूर्णप्रकाशन 2002 पृ. क्र. 96-97
2) किर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, चौथे पुनमुद्रण 2011, पृ. क्र. 160
3) पाटील पंढरीनाथ सिताराम, महात्मा ज्योतीबा फुले यांचे चरित्र मिलीद प्रकाशन, वर्धा 2008 पृ. क्र. 68
4) दांडगे ना. जा. समाज भूषण पंढरीनाथ सिताराम पाटील यांचे चरित्र, पैनगंगा पब्लिकेशन्स, बुलढाणा सप्टे 2005 पृ. क्र. 36
5) गोडे व्यंकटराव (संपा), साप्ताहिक ब्राम्हणेत्तर, वर्धा, दि. 1 डिसेबर 1926
6) चोपडे अशोक, विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य, कॅन्डीड प्रकाशन, वर्धा 28 नोव्हेंबर 2003 पृ. क्र. 29
7) गोडे व्यंकटराव (संपा), साप्ताहिक ब्राम्हणेत्तर, वर्धा, दि. 19 जानेवारी 1927 पृ. क्र. 02
8) ठाकुर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा प्रकाशन, पुणे जुलै 2005 पृ. क्र. 59